॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

अहिल्यानगर | शनिवार, दि. २८ मार्च २०२६ | वर्ष ६ वे | अंक ३१२ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com


✻ सुविचार ✻

जो परोपकारी स्वभावाचा तो खरोखर थोर होय.



कासार पिंपळगावातील बंधाऱ्यात गोणीत बांधलेला महिलेचा मृतदेह सापडला

पान क्र. २ वर



एक तास गोदावरी स्वच्छतेसाठी कोपरगावकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पान क्र. ३ वर



पाथर्डीत लाखो भाविकांच्या उपस्थितीत राम नवमी उत्सवाची पालखी मिरवणूक

पान क्र. ४ वर

## SPOT NEWS

### विजेचे दर कमी होणार

**मुंबई** – उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वीज दर निश्चितीबाबत फेरसुनावणी घेऊन राज्य वीज नियामक आयोगाने आपल्या पूर्वीच्याच निर्णयावर शिक्कामोर्तब केले आहे. पुढील ५ वर्षात सर्वच प्रवर्गातील ग्राहकांना पुरवण्यात येणाऱ्या विजेचे दर टप्प्याटप्प्याने कमी होणार असून, याची सुरुवात १ एप्रिलपासून होणार आहे. स्मार्ट मीटर असलेल्या ग्राहकांना दिवसा विजेच्या दरात सवलत मिळणार आहे. राज्य वीज दर नियामक आयोगाने २०२५ ते २०३० या ५ वर्षांसाठी विजेचे दर मागच्या वर्षी मार्च महिन्यात निश्चित करून दिले होते. मात्र, या निर्णयाला आव्हान देऊन पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आली. त्यावरही आयोगाने जून महिन्यात आपला निर्णय दिला. या निर्णयाला पुढे मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. महावितरणची बाजू ऐकून घेण्यात आली नाही म्हणून उच्च न्यायालयाने नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वावर बोट ठेवले व जूनचा आदेश रद्द केला होता. सर्वोच्च न्यायालयानेही उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला. त्यामुळे राज्य विद्युत नियामक आयोगाने महावितरणच्या पुनर्विचार याचिकेवर पुन्हा जनसुनावणी घेतली. नैसर्गिक न्याय तत्त्वाचे पालन करून व सर्व तांत्रिक बाबी पूर्ण करून आज आपला निर्णय जाहीर केला. वीज दर कपातीबाबतच्या आधीच्या निर्णयावर आयोगाने शिक्कामोर्तब केले. १०० ते ३०० युनिट वापर असलेल्या ग्राहकांसाठीचा दर १३ रुपये १७ पैशावरून कमी होऊन १२ रुपये ९४ पैसे होईल. उच्च दाब औद्योगिक ग्राहकांसाठीचा दर १० रुपये ७७ पैसे प्रती युनिटवरून कमी होऊन १० रुपये ७१ पैसे इतका होईल. याशिवाय स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती वीज ग्राहकांना सकाळी ९ ते दुपारी ५ या कालावधीतील वापरासाठी प्रती युनिट ८५ पैसे सवलत मिळेल. उद्योगांना व व्यावसायिक वीज ग्राहकांना सकाळी ८ ते दुपारी ५ या कालावधीतील वीज वापरासाठीची टीओडी सवलत चालूच राहणार आहे.

### राज्यातील जीएसटी विवरणात ६,६६६ कोटींच्या विसंगती

**नागपूर** – राज्यातील जीएसटी प्रदान करणे व विवरण दाखल करण्याच्या पद्धतीत मोठी विसंगती असल्याची बाब समोर आली आहे. ११९ प्रकरणांमध्ये तब्बल ६ हजार ६६६ कोटींच्या विसंगती आढळल्या आहेत. कॅगच्या अहवालात यासंदर्भात ठपका ठेवण्यात आला आहे. २०१९-१९ ते २०२०-२१ या वर्षासाठी जीएसटी प्रदान विवरणे दाखल करण्यासंदर्भात झालेल्या लेखापरीक्षणातून ही बाब स्पष्ट झाली आहे.कॅगच्या अहवालानुसार जीएसटी विवरणांच्या तपशीलवार लेखापरीक्षणांमध्ये लक्षणीय गैर अनुपालन निदर्शनास आले. ११९ प्रकरणांमध्ये ६ हजार ६६६ कोटींच्या विसंगती आढळल्या. त्यात आयटीसीचा वापर करणे, कर दायित्वाचे निर्वहन करणे, उलाढाल यात विसंगती आढळल्या. त्याचप्रमाणे कॅगतर्फे निवडण्यात आलेल्या १०० प्रकरणांपैकी ६२ मध्ये वित्तीय विवरणपत्रे, पूरक वित्तीय खातेवही, इनव्हॉईसेस, कराराच्या प्रती सादर करण्यात आले नाही.

# देशात लॉकडाउन लागणार नाही

## केंद्र सरकारच्या मंत्र्यांकडून स्पष्टोक्ती । भीतीची परिस्थिती निर्माण करू नका

**नवी दिल्ली । वीरभूमी–**

पश्चिम आशियातील संकटामुळे देशात देशव्यापी लॉकडाऊन लागू केला जाणार नाही, असे केंद्र सरकारने शुक्रवारी स्पष्ट केले. सरकारचे तीन वरिष्ठ मंत्री निर्मला सीतारामन, किरण रिजिजू आणि हरदीप पुरी यांनी निवेदने जारी करून या केवळ अफवा असल्याचे स्पष्ट केले. परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असल्याचे रिजिजू यांनी नमूद केले आणि खुद्द पंतप्रधान मोदी स्वत: या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असल्याचेही त्यांनी सांगितले.

पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनीही जनतेला घाबराट निर्माण न करण्याचे आवाहन केले आणि लॉकडाऊन लागू करण्याचा सरकारचा कोणताही इरादा नसल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित केले. वास्तविक पाहता, चार दिवसांपूर्वी संसदेत पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या एका विधानानंतर लॉकडाऊनबाबतच्या अफवा पसरण्यास सुरुवात झाली होती. सध्या सुरू असलेल्या संघर्षामुळे निर्माण झालेल्या कठीण जागतिक परिस्थितीचा परिणाम दीर्घकाळ टिकण्याची शक्यता आहे असे त्यांनी म्हटले होते. अशा प्रकारच्या आव्हानांचा सामना देशाने यापूर्वीही, अगदी कोविड-



१९ महामारीच्या काळातही, एकजुटीने आणि एकोप्याने केला आहे, असेही त्यांनी पुढे नमूद केले. आज संध्याकाळी पंतप्रधान सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचेही नियोजित आहे.

संसदीय कामकाज मंत्री किरण रिजिजू यांनी स्पष्ट केले, या सर्व अफवा कोण पसरवत आहे? पंतप्रधानांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, घाबरण्याची काहीही गरज नाही. साठेबाजांना (होर्डर्सना) इशारे देण्यात आले आहेत आणि राज्य सरकारांना साठेबाजी होणार नाही याची खात्री करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संपूर्ण परिस्थिती भारत सरकारच्या पूर्णपणे नियंत्रणात आहे. सर्वसामान्य जनतेला कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये यासाठी, अगदी सर्वोच्च स्तरापासून ते तळागाळापर्यंत-प्रत्येक पातळीवर देखरेख केली जात आहे; खुद्द पंतप्रधानही स्वत: या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

### अनावश्यक भीतीचे वातावरण : हरदीप पुरी

पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी नमूद केले की, लॉकडाऊनबाबत पसरणाऱ्या अफवा पूर्णपणे खोट्या आहेत. मला हे स्पष्ट करायचे आहे की, सध्या सरकारी पातळीवर अशा कोणत्याही प्रस्तावाचा विचार सुरू नाही. अशा वेळी, आपण सर्वांनी शांत, जबाबदार आणि एकजूट राहणे अत्यंत आवश्यक आहे. अशा परिस्थितीत अफवा पसरवणे आणि अनावश्यक भीतीचे वातावरण निर्माण करणे हे बेजबाबदारपणाचे लक्षण आहे.

## लॉकडाऊनबाबत अफवा पसरवल्यास फौजदारी कारवाई : मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई । वीरभूमी –**

सोशल मीडियावर देशात लॉकडाऊन लागू होणार असल्याची अफवा पसरवली जात असल्याने पेट्रोल पंपांवर नागरिकांच्या रांगा लागल्या आहेत. यावर स्पष्टीकरण देताना फडणवीस म्हणाले की, मध्य पूर्वेतील युद्धामुळे भारताच्या शेजारच्या देशात शटडाऊनची परिस्थिती आली आहे. मात्र, आपल्या केंद्र सरकारने उत्तम व्यवस्था केली आहे. लोकांनी विनाकारण पेट्रोल पंपांवर गर्दी करू नये. आपल्याकडे एक महिना पुरेल एवढा इंधन साठा आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. लॉकडाऊन लागणार नाही, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. याबद्दल खोटी माहिती पुरवणे गुन्हा ठरेल असाही त्यांनी इशारा दिला आहे.

मध्य पूर्वेतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर जगभरात इंधनाचे दर गगनाला भिडले असताना आणि अनेक देशांमध्ये आणीबाणीची स्थिती असताना, भारताने मात्र आपले इंधन व्यवस्थापन अत्यंत चोख ठेवले आहे. यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले असून सध्या सोशल मीडियावर पसरवल्या जाणाऱ्या लॉकडाऊनबाबतच्या अफवा फेटाळून लावल्या आहेत. देवेंद्र फडणवीस म्हणाले की जगभरात युद्धाची परिस्थिती असताना इंधन दरवाढीचे संकट उभे ठाकले आहे. अशा कठीण काळात भारत सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात घट करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला, त्याबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो. आपल्या शेजारील देशांमध्ये इंधनाच्या कमतरतेमुळे शाळा, कार्यालये आणि संस्था बंद करण्याची वेळ आली आहे, मात्र भारताने उत्तम व्यवस्थापनामुळे अशी वेळ येऊ दिली नाही.

मुख्यमंत्र्यांनी जनतेला विनंती केली आहे की, त्यांनी दररोज ज्याप्रमाणे आवश्यक तेवढेच इंधन भरता, तसेच भरावे. कोणत्याही अधिकृत माहितीशिवाय सोशल मीडियावरील अफवांना बळी पडू नये. देशात घरगुती गॅस किंवा पेट्रोल-डिझेलची कोणतीही कमतरता भासणार नाही, याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

# भोंदू खरात चौकशीच्या चक्रव्युहात

**नाशिक । वीरभूमी –**

भोंदू अशोक खरातचे कोट्यवधीचे आर्थिक उद्योग बघता आता त्याच्या मागे ईडी, विदेशी चलन (फॉरेक्स) आणि कस्टमचाही ससेमिरा लागण्याची चिन्हे आहेत. खरातच्या व्यवहाराची कागदपत्रे आता सक्तवसुली संचालनालयाकडे (ईडी) देण्यात येणार असल्याचे समजते. तसेच त्याच्या विदेश दौऱ्यांची व विदेशी चलन व्यवहारांची फॉरेक्सकडून चौकशी होणार आहे, तर दुसरीकडे त्याने तुर्कस्तानमधून आणलेल्या फर्निचरप्रमाणेच मोठ्या प्रमाणावर विदेशातून आणलेल्या अन्य साहित्यावर कस्टम ड्युटी भरली किंवा नाही याचीही तपासणी करण्यात येणार असल्याचे वृत्त आहे.

भोंदू खरातचे एकेक कारनामे उघड होत असून, महिलांच्या शोषणापलीकडे आर्थिक फसवणूक, खंडणी असे प्रकारदेखील समोर येत आहेत. काही तक्रारीत याचा ऊहापोह झाला असला तरी त्याच्या स्थावर-जंगम मालमत्तांमधील तरतूद, गुंतवणूक तसेच अन्य आर्थिक व्यवहार बघता ही अचंबित करणारी खरात फाइल्स श्रीमंती तक्रारीच्या रूपाने बाहेर पडत आहे. नाशिक आणि नगर मिळून ५२ मिळकतींची माहिती आहे.

काही ठिकाणी तो स्वत: मिळकतीचा मालक आहे, तर कुटुंबासह भागीदारीत जमिनी आहेत. दुर्मीळ भासणारे बनावट खडे, रत्न, पॉलिश केलेले चिंचोके, बनावट मध विकून मिळवलेली माया आता चौकशीला पात्र ठरली आहे. हा आकडा प्रचंड मोठा असल्याने आयकर विभागापाठोपाठ पोलिसांकडून सक्त वसुली संचालनालयालादेखील कागदपत्रे देण्यात येणार आहेत. तसेच पुण्यातील बांधकाम व्यावसायिक राजेंद्र जासूद यांनी बुधवारी (दि. २५) रात्री नाशिक पोलिसांकडे तक्रार केली. त्यात जासूद यांच्या पैशावर २१ देशांत सहली केल्याचे म्हटल्याने फॉरेक्स चलनाशी संबंधित विभागही तपासणी करणार आहे.

खरातच्या कारनाम्यामुळे अनेक शासकीय यंत्रणांप्रमाणेच कस्टम विभागाच्याही तो रडारवर असल्याचे समजते. तुर्कस्तानातून तब्बल २० लाख रुपयांचे फर्निचर आणून त्याने सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथील फार्म हाऊस सजवले. तुर्की टेबलसह अनेक प्रकारचे साहित्य त्याने विदेशातून आणले आहे. त्याची कस्टम ड्युटी भरली किंवा नाही त्याचीही आता तपासणी होणार असल्याचे वृत्त आहे.

भोंदूबाबा अशोक खरात याचा पिस्तुल परवाना रद्द करण्यात आल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. खरातविरुद्ध सरकारवाडा पोलिस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे आठ गुन्हे दाखल असून त्याचा तपास विशेष तपास पथक (एसआयटी) करीत आहे. तपासादरम्यान ताब्यातील खरातच्या शस्त्रसाठ्याबाबत धक्कादायक माहिती समोर आली होती. तर त्याच्या घरातून जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली होती, फार्महाऊसवरून एकूण २१ काडतुसे सापडली होती. यामध्ये पाच काडतुसे वापरलेली असल्याचे निष्पन्न झाले आहे. ही काडतुसे नेमकी कोणत्या कारणासाठी वापरण्यात आली, याचा तपास सध्या सुरू आहे.

# चाकणकरांनी प्रदेशाध्यक्षपदही सोडले

## भोंदूबाबा खरातला गुरू मानणे भोवले । निष्पक्ष चौकशीची मागणी

**मुंबई । वीरभूमी –**

अशोक खरात प्रकरणी रुपाली चाकणकर यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदानंतर राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला. खरातला गुरू मानणा-या रुपाली चाकणकरांवर महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा, यासाठी दबाव होता. आता त्यांनी या पदाचा राजीनामा दिला. या संपूर्ण प्रकरणात निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी आपली मागणी असल्याचे रुपाली चाकणकर यांनी म्हटले.

खरात प्रकरणी आपण आधीच भूमिका स्पष्ट केली आहे. त्याच्याशी संबंधित कोणत्याही आर्थिक व्यवहारात किंवा गैरकृत्यात आपला दुरान्वयेही संबंध नाही. पोलिस तपासात या गोष्टी समोर येतीलच. हा तपास पारदर्शकपणे आणि निष्पक्षपणे व्हावा, अशी मागणी आपण मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पोलिस महासंचालकांकडे केली आहे, असे रुपाली चाकणकरांनी म्हटले.

शेकडो महिलांचे लैंगिक शोषण



केल्या प्रकरणी अशोक खरातवर कारवाई झाली. अशोक खरातसोबत रुपाली चाकणकरांचे काही फोटो व्हायरल झाल्यानंतर चाकणकरांवर टीका होऊ लागली. चाकणकर या अशोक खरातला गुरू मानायच्या, त्यामुळे या आधीच्या काही प्रकरणात चाकणकरांनी राजकीय हस्तक्षेप केल्याचे समोर आले होते.

अशोक खरात प्रकरणी रुपाली चाकणकरांनी राजीनामा द्यावा, यासाठी विरोधी पक्षांनी दबाव वाढवला. तसेच राष्ट्रवादीतील एका गटानेही ही मागणी केल्याची माहिती समोर आली. त्यानंतर आधी रुपाली चाकणकर यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर आता राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा दिला.

### चाकणकर यांच्या अडचणी वाढणार

रुपाली चाकणकर या अशोक खरातच्या शिवनिका ट्रस्टच्या संचालिका होत्या. खरात प्रकरणी जे कुणी दोषी असतील, अशोक खरातशी ज्यांचे कुणाचे संबंध असतील, त्यांना सोडणार नाही असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला होता. तसेच शिवनिका ट्रस्टच्या संचालकांचीही चौकशी केली जाणार आहे. त्यामुळे चाकणकर यांचीही चौकशी होऊ शकते.

# स्टंटबाजीसाठी न करता खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचवा

## आमदार मोनिकाताई राजळे यांच्या अधिकाऱ्यांना सुचना । अकोला येथे महाराजस्व समाधान अभियान

**पाथर्डी । वीरभूमी–**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व व समाधान अभियान तालुक्यात महसूल मंडळनिहाय सुरू आहे. मात्र या कार्यक्रमांना लाभार्थ्यांची संख्या अत्यल्प असल्याचे दिसून येत आहे. खऱ्या लाभार्थ्यांवर अधिकाऱ्यांनी लक्ष केंद्रित करून प्रशासकीय यंत्रणांनी गांभीर्याने काम करावे, तसेच गावपातळीवरील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनीही याकडे लक्ष द्यावे. गर्दी जमवण्यासाठी किंवा स्टंटबाजीसाठी हा कार्यक्रम नसल्याचे भान ठेवावे, अशा शब्दांत आमदार मोनिकाताई राजळे यांनी अधिकाऱ्यांना समज देत लाभार्थ्यांच्या कमी उपस्थितीकडे लक्ष वेधले.

तालुक्यातील अकोले येथे मंडळनिहाय तिसरे अभियान संपन्न झाले. उद्घाटन सोहळ्यात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रांताधिकारी प्रसाद मते होते. प्रमुख उपस्थितांमध्ये तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, नायब तहसीलदार दिग्विजय पाटील, तालुका कृषी अधिकारी महादेव लोंढे, सरपंच जया गर्जे, माजी सरपंच नारायण पालवे व सुभाष केकान, मोहटा देवस्थानचे विश्वस्त बाबासाहेब दहिफळे, मुख्याध्यापक राजेंद्र गर्जे, ज्येष्ठ नेते अशोक चोरमले, भगवान साठे आदींसह ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विविध योजनांच्या लाभार्थ्यांना कागदपत्रांचे समारंभपूर्वक वितरण करण्यात आले.

यावेळी बोलताना आमदार राजळे म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या पुढाकाराने महाराजस्व समाधान अभियान राबवले जात आहे. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत वेळेत आणि प्रभावीपणे पोहोचावा, यासाठी या अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील गरजू नागरिकांना किरकोळ कामांसाठी वारंवार हेलपाटे मारावे लागू नयेत, तसेच महत्त्वाच्या कामांसाठी अडवणूक न होता वेळेवर लाभ मिळाल्यास शासनाची प्रतिमा लोकमानसात सकारात्मक राहते, असेही त्यांनी सांगितले. नॉन-प्लॅनिंग रस्त्यांतर्गत रस्त्यांची दुरुस्ती, काँक्रिटीकरण करून मुख्य रस्त्यांशी जोडणे, तसेच पाणंद रस्त्यांचे प्रश्न सोडविण्यास या अभियानामुळे मदत होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या अभियानाकडे सहजतेने पाहू नये. लोकप्रतिनिधींच्या संपर्कातून कार्यकर्ते कार्यक्रमाला येतात, मात्र गावपातळीवरील ग्रामसेवक, तलाठी, मंडलाधिकारी यांनी लाभार्थ्यांच्या संपर्कात राहून अभियानाचे महत्त्व पटवून देणे आणि उपस्थितीबाबत योग्य माहिती देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात समस्या नाहीत किंवा लाभार्थी नाहीत असा समज करून न घेता कार्यक्रम गांभीर्याने घ्यावा. पुन्हा पुन्हा सूचना देण्याची वेळ येऊ नये. शासनाच्या पातळीवर कामे



सुरू असून, यंत्रणेच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या प्रतिमेला धक्का बसतो. प्रत्यक्ष लाभार्थी वंचित राहत असतील तर त्यास यंत्रणा जबाबदार ठरेल. पुढील अभियानासाठी आतापासूनच तयारीला लागा, अशा शब्दांत त्यांनी प्रशासनाला निर्देश दिले.

यावेळी विविध वक्त्यांनी मनोगत व्यक्त करत महाराजस्व अभियानाचे महत्त्व व उपयोगिता स्पष्ट केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांनी केले. सूत्रसंचालन महेश अंगरखे यांनी केले. स्वागत मंडलाधिकारी कविता इंदलकर यांनी केले, तर आभार ग्राम महसूल अधिकारी सचिन लोहकरे यांनी मानले.

# SPOT NEWS

## कल्याणी मुरदारे यांना ॲग्रीकल्चर एक्सलंन्स पुरस्कार जाहीर

**शेवगाव । वीरभूमी–**



तालुक्यातील प्रगतशील महिला शेतकरी कल्याणी मुरदारे (रा.भगुर, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर) यांची 'तिफण कृषी गौरव २०२५' अंतर्गत ॲग्रीकल्चर एक्सलंन्स पुरस्कारासाठी निवड जाहीर करण्यात आली आहे. तिफण फाऊंडेशन यांच्या वतीने कृषी क्षेत्रात नाविन्यपूर्ण, प्रेरणादायी व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांना हा सन्मान प्रदान केला जातो. सौ. मुरदारे यांनी शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सेंद्रिय शेतीचा अवलंब आणि विविध प्रयोगांच्या माध्यमातून उल्लेखनीय प्रगती साधली आहे. त्यांनी आपल्या शेतीत विविध प्रकारच्या पिकांची लागवड करून उत्पादन क्षमता वाढवली असून हरित व शाश्वत शेतीचा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या शेतात विविध फळझाडे, भाजीपाला व धान्य उत्पादन घेतले जात असून 'शेतातून थाळीपर्यंत' ही संकल्पना यशस्वीपणे राबवली जात आहे. तसेच, त्यांनी गोपालन क्षेत्रातही विशेष कामगिरी करत दुग्ध उत्पादन वाढवले आहे. सेंद्रिय पद्धतीने तयार केलेल्या दुग्धजन्य पदार्थांमुळे त्यांना चांगला प्रतिसाद मिळत असून एकात्मिक शेतीचे प्रभावी मॉडेल त्यांनी उभे केले आहे. त्यांच्या या कार्यामुळे अनेक तरुण व महिला शेतकऱ्यांना प्रेरणा मिळत आहे. या पुरस्काराबाबत तिफण फाऊंडेशन कडून अधिकृत पत्र देण्यात आले आहे. या यशाबद्दल सौ. कल्याणी कैलास मुरदारे यांचे सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## धामणगाव आवारीच्या आदित्य तळपाडेची नवोदय विद्यालयासाठी निवड

**अकोले । वीरभूमी–**



तालुक्यात विविध उपक्रमांनी गाजलेल्या धामणगाव आवारी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षण घेत असलेला आदित्य सखाराम तळपाडे याची अहिल्यानगर जिल्ह्यातील जवाहर नवोदय विद्यालयासाठी निवड झाली आहे. आदित्यने अनेक स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मागील वर्षी 'मिशन आरंभ'मध्ये त्याने जिल्ह्यात दहावा तर तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला होता. तसेच 'मंथन'तर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेतही त्याने जिल्ह्यात दुसरा क्रमांक पटकावला होता. या यशासाठी वर्गशिक्षक रावसाहेब भोर यांनी विशेष परिश्रम घेतले. आदित्यच्या यशाबद्दल गट विकास अधिकारी अमर माने, गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत, शिक्षण विस्तार अधिकारी जनार्दन भंवरे, केंद्रप्रमुख सुनील नरसाळे, शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता चासकर, ग्रामविकास अधिकारी सखाराम तळपाडे, आधार फाउंडेशनचे समन्वयक डॉ. महादेव अरगडे, बाळासाहेब पिंगळे, सुखदेव इल्हे, सोमनाथ मदने आदींनी त्याचे कौतुक करत विशेष अभिनंदन केले आहे.

## राहुरी पोटनिवडणुकीसाठी भाकपकडून कॉ. उमेश जोशी यांना उमेदवारी जाहीर

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

राहुरी विधानसभा पोटनिवडणूक भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप) लढविणार असल्याची घोषणा पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. भाजप व त्याचे काही मित्र पक्ष ही निवडणूक बिनविरोध करण्याच्या तयारीत असल्याचा आरोप करत, मात्र ज्यांच्यासाठी बिनविरोध करावी त्यांचे योगदान काय? असा सवाल भाकपचे राज्य सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे यांनी उपस्थित केला. बुरुडगाव रोड येथील पक्ष कार्यालयात भाकपच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत राहुरी विधानसभा पोटनिवडणूक लढविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच आयटी इंजिनिअर असलेले युवक कॉ. उमेश जोशी यांना अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यात आली. यावेळी कॉ. लांडे अध्यक्षस्थानी होते. या बैठकीस जिल्हा सहसचिव कॉ. ड. सुधीर टोकेकर, कॉ. संदीप इथापे, कॉ. ज्ञानेश्वर गायकवाड, कॉ. ज्ञानदेव सहाणे, कॉ. रघुनाथ पवार, प्रताप सहाणे, दशरथ हासे, नारायण मेमाणे, बापू राशिनकर, ज्ञानदेव गायकवाड, सुनील दुधाळे, जफर कुरेशी आदी पदाधिकारी उपस्थित होते. सध्या कांद्याचे भाव पडले असून, शेतकरी वर्ग प्रचंड तणावात आहे. अशा परिस्थितीत शासनाने प्रत्येक शेतकऱ्याला अनुदान द्यावे. तसेच युद्धाच्या परिणामी गॅसच्या किमतीत वाढ करण्यात आली आहे, ती ताबडतोब रद्द करण्यात यावी अशी मागणी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. अध्यक्षीय भाषणात कॉ. सुभाष लांडे म्हणाले की, राहुरी हा कम्युनिस्ट पक्षाचा बालेकिल्ला राहिला आहे. १९७२ साली पी.बी. कडू पाटील हे आमदार म्हणून निवडून आले होते. या भागातून खंडकरी व शेतकरी चळवळी उभ्या राहिल्या आहेत. त्यामुळे शेतकरी, कामगार आणि कष्टकरी वर्गाच्या प्रश्नांवर ही निवडणूक लढविण्याची तयारी भाकपने केली आहे.

# कासार पिंपळगावातील बंधाऱ्यात गोणीत बांधलेला महिलेचा मृतदेह सापडला

**अज्ञात आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल । महिलेची ओळख पटवण्यासाठी पोलिसांचे आवाहन**

**पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी तालुक्यातील कासार पिंपळगाव येथील मुळा पाटबंधारेच्या चारी खाली असलेल्या बंधाऱ्यातील पाण्यात एका अनोळखी महिलेचा मृतदेह गोणीत बांधलेल्या अवस्थेत आढळून आला. ही घटना शुक्रवार दि. २७ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास उघड झाली. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून पोलिसांनी सदरील मृतदेह ताब्यात घेत पाथर्डी पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०३(१) व २३८ अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत समजलेली माहिती अशी की, पाथर्डी तालुक्यातील कासार पिंपळगाव येथे ग्रामपंचायतीच्या सार्वजनिक विहिरीजवळ असलेल्या बंधाऱ्यातील पाण्यात गोणीमध्ये काहीतरी तरंगत असल्याचे आढळून आले. सध्या मुळा कॅनॉलला पाणी असल्यामुळे या पाण्याने बंधारा भरलेला आहे. बंधाऱ्यालगत ग्रामपंचायतीची सार्वजनिक विहिर आहे. याच विहिरीतून गावाला पिण्याचे पाणी पुरविले जाते. सुरुवातीला त्या गोणीत मृत जनावर असावे असा संशय ग्रामस्थांना आला. पाणी दूषित होऊ नये म्हणुन काही ग्रामस्थांनी ती गोणी बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र गोणी काढतांना फाटल्याने त्यातून मानवी पाय बाहेर आल्याने गोणीमध्ये मृत जनावर नसून मृतदेह असल्याचे समजताच पाथर्डी पोलिस ठाण्यात याबाबत खबर देण्यात आली.



घटनेचे गांभिर्य ओळखून पो.नि. विलास पुजारी यांनी स्वतः पथकासह येत पहाणी केली. मृतदेह असलेली गोणी बंधाऱ्यातील पाण्यात तरंग असतांना पाहुन जेसीबीच्या साह्याने व ग्रामस्थांच्या मदतीने गोणी पाण्याबाहेर काढण्यात आली. यावेळी फॉरेन्सिक व श्वान पथकाने घटनास्थळी तपासणी केली.

मृतदेह काही प्रमाणात कुजलेल्या अवस्थेत असल्याने तो उत्तरीय तपासणीसाठी पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. प्राथमिक माहितीनुसार गोणीत बांधलेला मृतदेह हा महिलेचा असून अंदाजे ५५ ते ६० वर्षे वायोगटातील असून तिचा रंग गोरा, उंची सुमारे १६० सेंमी आहे. तिचे केस काळे-पांढरे असून हातात चॉकलेटी-सोनेरी रंगाच्या काचेच्या बांगड्या, गळ्यात काळ्या-पिवळ्या मण्यांचे मंगळसूत्र आहे. उजव्या हातावर 'पाच आसरा' असे गोंदलेले असून अंगावर काळा ब्लाऊज व जांभळ्या रंगाची नऊवारी साडी परिधान केलेली आहे. मृतदेह काही प्रमाणात कुजलेल्या अवस्थेत असल्याचेही पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी अमोल जवरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०३(१) व २३८ अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विलास पुजारी करत असून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. अनोळखी महिलेची ओळख पटवून आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथक नियुक्त करण्यात आले आहे.

दरम्यान, या प्रकरणात नागरिकांनी पुढाकार घेत माहिती देण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. संबंधित महिलेबाबत किंवा आरोपीबाबत काही माहिती असल्यास तात्काळ पाथर्डी पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### तरुणांच्या धाडसाचे कौतुक

सध्या मुळा धरणाचे आवर्तन सुरु असल्याने कॅनॉल लगतचा बंधारा पाण्याने भरलेला आहे. याच ठिकाणी ग्रामपंचायतीची सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेची विहिर असून येथून गावाला पिण्याचे पाणी पुरवठा केला जातो. या अगोदर काही महिन्यांपूर्वीही अशाच प्रकारे बंधाऱ्याच्या पाण्यात गोणीत मृत जनावर टाकण्यात आले होते. त्यामुळे यावेळीही तसाच प्रकार असल्याचा समज झाल्याने लगतच्या विहिरीमधील पाणी दूषित होऊ नये म्हणुन गोणी बाहेर काढण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र त्यात महिलेचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली. मृतदेह काहीप्रमाणात कुजलेला असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली होती. अशा परिस्थितीतही गावातील काही तरुणांनी पुढाकार घेत पोलिसांना मृतदेह बाहेर काढण्यासाठी मदत केली. त्यांच्या या धाडसाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## युवा उद्योजक लक्ष्मण नगरे यांच्याकडून वाढदिवसानिमित्त सहारा संस्थेला ५१ हजारांची मदत

**श्रीगोंदा । वीरभूमी –**

समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द आणि माणुसकीची जपणूक करत युवा उद्योजक लक्ष्मण नगरे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त एक प्रेरणादायी आदर्श घालून दिला. त्यांनी सहारा सर्वांगीण विकास संस्थेला ५१ हजार रुपयांची आर्थिक मदत देत सामाजिक कार्याला हातभार लावला.



यावेळी सहारा संस्थेच्या कार्यालय, ट्रेनिंग सेंटर व मुलांच्या संगोपनासाठी उभारण्यात येणाऱ्या बांधकामाचे भूमिपूजन नगरे यांच्या हस्ते करण्यात आले. वाढदिवस साध्या पद्धतीने साजरा करत केक कापण्याऐवजी भारतीय संविधानाची उद्देशिका देऊन कार्यक्रमाला वेगळा सामाजिक संदेश देण्यात आला. या उपक्रमात विजय काकडे यांनीही ११,१११ रुपयांची मदत करून शिक्षण क्षेत्रातील आपली बांधिलकी व्यक्त केली. तसेच सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत थोरात यांनी ५ हजार रुपयांचे योगदान दिले.

सहारा सर्वांगीण विकास संस्था अनाथ, निराधार, ऊसतोड मजूर व कचरा वेचणाऱ्या मुलांसाठी निवासी शिक्षण प्रकल्प राबविणार आहे. या उपक्रमाची माहिती मिळताच लक्ष्मण नगरे यांनी सर्वप्रथम मदतीचा हात पुढे केल्याचे विशेष आहे. कार्यक्रमात विजय काकडे यांनी शिक्षणासाठी आम्ही सदैव पाठीशी आहोत असा विश्वास व्यक्त करत या कार्याचे कौतुक केले.

संस्थेमार्फत एकाच छताखाली कायदे, शासन निर्णय, भारतीय संविधान, मूलभूत हक्क व कर्तव्य यांचे मार्गदर्शन दिले जाणार असून महिला सक्षमीकरण व विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठीही प्रयत्न केले जाणार आहेत. ही मदत केवळ आर्थिक नसून आमच्या कार्यावरचा विश्वास आहे, अशी भावना व्यक्त करत संस्थेचे अध्यक्ष संतोष भोसले यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले.

यावेळी दादासाहेब नगरे, सुनील म्हस्के, प्रकाश काकडे, संजय काकडे, भरत काकडे, मारुती शेलार, नामजी जठार, छाया भोसले, रवींद्र चव्हाण, बबन गोरखे, केशव दळवी, दत्ता गोसावी, उत्तम दळवी, रवींद्र डांगे, अजय खोमणे, निखिल गोरखे, अनिल नेटवटे, मंगेश गोरखे आदी उपस्थित होते.

## कोपरगावात शिर्डीला जाणाऱ्या साईभक्तांना राष्ट्रवादी काँग्रेसकडून लस्सी व मसाला ताक वाटप

**कोपरगाव । वीरभूमी–**

कोपरगाव नगरीत श्रीरामनवमीच्या पावन पर्वानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही कोपरगाव ते शिर्डी साईगाव पालखी सोहळा अत्यंत भक्तिभावाने आणि मोठ्या उत्साहात संपन्न झाला. साईनामाच्या गजरात, 'जय साईराम' आणि 'जय श्रीराम' च्या घोषणांनी आसमंत दुमदुमून गेला होता. हजारो साईभक्त निः स्वार्थ भावनेने, पायी चालत साईबाबांच्या पवित्र दर्शनासाठी मार्गस्थ झाले होते.



या भक्तिमय वातावरणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आ.आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिर्डीला पायी जाणाऱ्या साईभक्तांसाठी लस्सी व मसाला ताकाचे वाटप करून सेवाभावाची सुंदर परंपरा जपण्यात आली. साई दर्शनाच्या ओढीने पायी चालणाऱ्या भाविकांसाठी हा उपक्रम आनंद देणारा ठरला. या सेवाभावी उपक्रमांमुळे समाजात सद्भावना, सहकार्य आणि श्रद्धेची भावना अधिक दृढ होत असून, साईभक्तांच्या सेवेत सदैव तत्पर राहण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अत्यंत निष्ठेने व समर्पणाने या उपक्रमात सहभाग घेतला. प्रत्येक साईभक्ताला प्रेमाने थंडगार लस्सी व ताक देताना त्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि सेवाभाव स्पष्ट दिसत होता. सेवेतूनच ईश्वरप्राप्ती या तत्त्वाचा प्रत्यय या उपक्रमातून आला. यावेळी सर्व साईभक्तांना आमदार आशुतोष काळे यांच्या वतीने श्रीरामनवमीच्या मंगलमय शुभेच्छा देण्यात आल्या. भक्ती, सेवा आणि एकात्मतेचा सुंदर संगम या प्रसंगी अनुभवायला मिळाला. जय श्रीराम च्या घोषणांनी परिसर अक्षरशः भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

## अजितदादा पवार विमान अपघात प्रकरणातील 'झिरो एफआयआर' कायदेशीरच : ॲड. सुरेश लगड

**दखलपात्र गुन्ह्यांमध्ये देशात कुठेही एफआयआर नोंदवण्याची तरतूद । सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचाही उल्लेख**

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

अजितदादा पवार यांच्या कथित विमान अपघात मृत्यू प्रकरणी कर्नाटक राज्यात नोंदविण्यात आलेला एफआयआर हा पूर्णपणे कायदेशीर आहे, असे मत विधी क्षेत्रातील ज्येष्ठ वकील ड. सुरेश लगड यांनी व्यक्त केले आहे.

कर्नाटक राज्यात झिरो नंबरने नोंदविण्यात आलेला एफआयआर बेकायदेशीर असल्याचे विधान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्याची चर्चा असताना, ॲड. लगड यांनी या संदर्भात कायदेशीर बाजू स्पष्ट केली.



ते म्हणाले की, एखादा दखलपात्र गुन्हा घडल्यास संपूर्ण भारतात कुठल्याही पोलीस ठाण्यात 'झिरो एफआयआर' नोंदवता येतो. भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १७३ नुसार कोणत्याही पोलीस स्टेशनला एफआयआर नोंदवणे अनिवार्य आहे. त्यामुळे देशातील कोणत्याही ठिकाणी झिरो नंबरने एफआयआर दाखल करता येतो आणि नंतर तो संबंधित पोलीस ठाण्याकडे वर्ग केला जातो.

मुळात 'झिरो एफआयआर' ही कायद्याने मान्यताप्राप्त संकल्पना असून, फिर्यादीने दिलेली माहिती दखलपात्र गुन्हा दर्शवत असल्यास ती कुठेही नोंदवता येते. एफआयआर नोंदवण्यास नकार देणे हा कायद्याचा भंग ठरतो आणि त्यामुळे फिर्यादीच्या मूलभूत हक्कांवर गदा येऊ शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

तसेच, दखलपात्र गुन्ह्याची तक्रार ऑनलाईन पद्धतीनेही नोंदवता येते, याकडे त्यांनी लक्ष वेधले. सर्वोच्च न्यायालयाने ललिता कुमारी विरुद्ध उत्तर प्रदेश या महत्त्वपूर्ण निवाड्यात कुठेही झिरो नंबरने एफआयआर नोंदवून तो संबंधित पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्याचे निर्देश दिले आहेत, असेही ॲड. सुरेश लगड यांनी नमूद केले.

## दसरे नगरात श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

शहरातील दसरे नगर परिसरात स्वराज प्रतिष्ठानच्या वतीने गुरुवारी श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. उपस्थित महिला भाविकांनी भगवान श्रीराम जन्माचा पाळणा हलविला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी राम परिसर रामनामाच्या गजराने, भजन-कीर्तन, आरती आणि धार्मिक वातावरणाने भारावून गेला होता. उपस्थित भक्तांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेत श्रीराम जन्मोत्सवाचा आनंद लुटला. या कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके, रूपालीताई वारे, संध्याताई पवार यांनीही कार्यक्रमास उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवली

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी किशोर वाणी होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थितांमध्ये बाळकृष्ण नरवडे, भाऊसाहेब आव्हाड, अजित शहाणे, महादेव साबळे, वासुदेव आव्हाड, सारंग शहाणे, तुकाराम मिसाळ, राजू गीते, योगेश जावळे, मयूर सूर्य पुजारी तसेच शेखर बनकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान विविध धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

# स्वत:च्या क्षमतेवर विश्वास ठेवा, यश आपोआप मिळेल

**नितिन कोल्हे । संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजमध्ये राष्ट्रीय प्रकल्प स्पर्धेचे उद्घाटन**

**कोपरगाव । वीरभूमी–**

कोणत्याही व्यक्तीच्या यशामध्ये भाषा कधीच अडथळा ठरत नाही, तर स्वतः मधील क्षमता ओळखून योग्य वेळी त्या सिद्ध करण्याची गरज असते. प्रत्येकामध्ये अपार क्षमता दडलेली असते, मात्र ती संधी मिळाल्यावरच प्रकट होते. बदलत्या काळानुसार स्वतःला सतत अद्ययावत ठेवणे आणि नवीन गोष्टी शिकण्याचा प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे. याची सुरुवात स्वतः पासून करावी लागते, कारण गरज भासल्यास योग्य मार्गदर्शन करणारे शिक्षकही मिळतात. जीवनात नेमके काय साध्य करायचे आहे आणि कोणत्या दिशेने वाटचाल करायची आहे, हे स्पष्ट ठरवणे महत्त्वाचे आहे. तसेच आपल्या कामात वेग आणि नियोजन किती आहे, यावरच यशाची खरे मोजमाप ठरते, असे प्रतिपादन संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष नितिन कोल्हे यांनी केले.

संजीवनी शैक्षणिक संकुलाचे संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांच्या जयंती निमित्ताने इंडियन सोसायटी फॉर एज्युकेशनच्या सहकार्याने संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या विद्यार्थी उपक्रम परिषदेने आयोजीत केलेल्या राष्ट्रीय प्रकल्प स्पर्धा 'संजीवनी टेकफेस्ट ' उद्घाटन प्रसंगी नितिनदादा कोल्हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे चिफ टेक्निकल ऑफीसर श्री विजय नायडू, डॉ. प्रसाद पटारे, स्पर्धेचे जज रविंद्र जोशी , हेड ऑफ इन्स्टिटयूट सर्विसेस श्री प्रकाश जाधव, स्पर्धेचे समन्वयक डॉ. मकरंद कुलकर्णी, विभाग प्रमुख, डीन्स उपस्थित होते. सर्व प्रथम स्व. शंकरराव कोल्हे यांच्या प्रतिमा पुजनाने व दीप प्रज्वलाने स्पर्धेचे उद्घाटन झाले. या स्पर्धेत ७५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना विविध प्रकल्पांतर्गत सहभाग नोंदवुन नवोन्मेशक कल्पनांचे सादरीकरण केले.




यावेळी समन्वयक डॉ. कुलकर्णी यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून स्व. शंकरराव कोल्हे यांच्या जयंती निमित्ताने विद्यार्थ्यांना आपली कल्पना शक्ती आणि प्रतिभा दाखविण्याची संधी निर्माण केली आहे असे सांगितले. डॉ. पटारे यांनी संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या प्रगतीचा आलेख मांडला.

सदर प्रसंगी श्री नायडू म्हणाले की, स्पर्धेमध्ये जिंकणे किंवा हरणे यापेक्षा सहभाग घेणे अधिक महत्त्वाचे मानले जाते, कारण त्यातूनच व्यक्तिमत्वाचा आणि कौशल्यांचा खरा विकास घडतो. पूर्वी शैक्षणिक क्षेत्रात केवळ टॉपर विद्यार्थ्यांना अधिक महत्त्व दिले जात होते, मात्र आजच्या काळात विविध कौशल्ये (स्किल सेट) असलेल्या विद्यार्थ्यांना अधिक संधी मिळत आहेत. स्पर्धा या केवळ निकालासाठी नसून विद्यार्थ्यांच्या कौशल्यवृद्धीसाठी एक प्रभावी माध्यम आहेत, त्यामुळे प्रत्येकाने त्याचा योग्य लाभ घ्यावा.

श्री जोशी म्हणाले की येणारा काळ हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा असून विद्यार्थ्यांनी त्याचे ज्ञान आत्मसात करणे अत्यंत गरजेचे आहे. संजीवनी संस्थेचे माजी विद्यार्थी आज जगभर विविध क्षेत्रात कार्यरत असून, हीच संस्थेच्या गुणवत्तेची खरी पावती आहे. संस्थेचे अध्यक्ष नितीन कोल्हे आणि मॅनेजिंग ट्रस्टी श्री अमित कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचा अभ्यासक्रम शिकवला जातो, त्याचेच हे यशस्वी फलित आहे. तसेच संस्थेचे संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे जिथे कुठे असतील, तेथून संजीवनीची ही यशोगाथा अभिमानाने पाहत असतील, अशी भावना यावेळी त्यांनी व्यक्त केली.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS



## विश्व हिंदू परिषदेकडून पाथर्डीत श्रीराम नवमी उत्सव साजरा

**पाथर्डी । वीरभूमी–**

शहरातील श्रीराम भक्त तसेच विश्व हिंदू परिषद यांच्या वतीने कोरडगाव चौक येथे श्रीराम नवमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमा दरम्यान श्रीरामाच्या प्रतिमेची पूजाअर्चा करून भजन, कीर्तन तसेच जयघोष करण्यात आला. मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून श्रीरामाच्या चरणी आपली श्रद्धा अर्पण केली. यावेळी नगराध्यक्ष अभय आव्हाड, बांधकाम समिती सभापती नंदकुमार शेळके, आरोग्य शिक्षण व क्रीडा सभापती बंडूशेठ बोरुडे, विश्व हिंदू परिषदेचे तालुकाध्यक्ष किशोर परदेशी, आजिनाथ मोरे, सामाजिक कार्यकर्ते आजिनाथ डोमकावळे, माऊली कोकाटे, प्रताप तांदळे, सोमनाथ दुधाणे, महेश आंतरकर, अमोल केळकर, महेंद्र परदेशी, बबन सबलस आदी मान्यवर उपस्थित होते. किशोर परदेशी म्हणाले, श्रीराम नवमी हा केवळ धार्मिक उत्सव नसून समाजामध्ये एकात्मता, संस्कार व धर्मभावना जागृत करणारा सण आहे. अशा उत्सवांच्या माध्यमातून समाज एकत्र येतो व युवकांमध्ये चांगले विचार रुजवले जातात असे ते म्हणाले. उत्सवानिमित्त उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## श्रीक्षेत्र मोहटादेवीगड येथे श्रीराम नवमी मोठ्या उत्साहात साजरी



**पाथर्डी । वीरभूमी –**

वासंतीक नवरात्र महोत्सव अंतर्गत श्रीक्षेत्र मोहटादेवीगड येथे श्रीराम नवमीचा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमीत्त श्रीक्षेत्र मोहटादेवीगडावर सकाळपासुन भावीकांची मोठी गर्दी होती. श्रीराम जन्माचा सोहळा विधीवत पुजन तहसिलदार तथा विश्वस्त डॉ. उध्दव नाईक, शशिकांत दहिफळे, बाबासाहेब दहिफळे, अशोक दहिफळे, श्रीकांत उर्फ बाळासाहेब लाहोटी, शुभम दहिफळे यांच्या हस्ते करण्यात आले. विधीवत पुजन झाल्यानंतर फुलांच्या वर्षावाने तसेच जय श्रीराम, जय मोहटादेवी च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. श्रीराम जन्मानंतर पारंपारिक पध्दतीने प्रभू रामाचा पाळण्याचे गायन करण्यात आले. आरतीनंतर भावीकांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले होते. श्रीराम जन्मोत्सवाचे विधीवत पुजन देवस्थानचे पुजारी वे भूषणदेवा साकरे, भास्कर देशपांडे यांनी केले. पाथर्डी येथील कु. गोला राधा आनंद, कु. गोला सस्कृती आनंद यांनी रांगोळीच्या साह्याने श्रीरामाची प्रतिमा साकारली. त्यानिमीत्ताने देवस्थानच्या विश्वस्त मंडळाच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे, लेखापाल संदीप घुले, कर्मचारी, ग्रामस्थ व भावीक भक्त मोठ्या संख्यने उपस्थित होते.

## रामनवमी निमित्त ५० किलोमीटर सायकल राईड उत्साहात संपन्न

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

रामनवमीच्या पावन पर्वानिमित्त अहिल्यानगर सायकलिस्ट असोसिएशनतर्फे गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ रोजी नगर शहरातील छत्रपती संभाजी रोडवरील महाराजा हॉटेल येथून सोलापूर रोड मार्गे दहीगाव साकत येथील प्राचीन राममंदिरापर्यंत भव्य सायकल राईडचे आयोजन करण्यात आले होते. धार्मिक श्रद्धा, आरोग्यजागर आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या राईडमध्ये १५ ते ७० वयोगटातील सुमारे ६० सायकलस्वार सहभागी झाले होते. एकूण सुमारे ५० किलोमीटरचे अंतर सायकलस्वारांनी यशस्वीरीत्या पूर्ण करत आपल्या फिटनेसची प्रचिती दिली.

# एक तास गोदावरी स्वच्छतेसाठी कोपरगावकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## गोदामाई प्रतिष्ठानकडून गोदावरी नदीची ३६० आठवड्यापासून निरंतरपणे स्वच्छता सुरु

**कोपरगाव । वीरभूमी –**

अनेक तज्ञांच्या मते भविष्यातील तिसरे महायुद्ध हे तर फक्त नैसर्गिक साधन संपत्ती वरूनच होणार असून यात पाणी हा महत्त्वाचा घटक असणार आहे त्यामुळे प्रत्येक देशाने पाण्याचे जतन तसेच पाणी वाहून नेणाऱ्या स्त्रोतांची स्वच्छता करणे ही काळाची गरज होऊन बसली आहे आणि यासाठी कोपरगाव शहरातील गोदामाई प्रतिष्ठान ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष आदिनाथ ढाकणे व त्यांची संपूर्ण टीम कोपरगाव शहरातून वाहणाऱ्या पवित्र अशा गोदावरी नदीची ३६० आठवड्यापासून निरंतरपणे स्वच्छता करत आहे. आज बुधवार दिनांक २५ मार्च रोजी त्यांचा या स्वच्छता मोहिमेचा ३६१ वा आठवडा असल्याने या मोहिमेत कोपरगाव शहरातील अनेक मान्यवरांनी सहभागी होत एक तास गोदावरी नदी स्वच्छतेसाठी आपल्या उज्वल भविष्यासाठी ही मोहीम राबवत एक अनोखा संदेश दिला आहे.



याप्रसंगी प्रसिद्ध सिने अभिनेते चिन्मय उदगीरकर, कोपरगाव नगरपालिकेचे मुख्याधिकारी सुहास जगताप, कोपरगाव शहर पोलीस उपनिरीक्षक संदीप सोने, दीपक रोठे, सोमय्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय ठाणगे, चंद्रकिशोर पाटील, कोपरगाव नगरपालिकेचे नगरसेवक बाळासाहेब रुईकर, रवींद्र कथले, अनिल आव्हाड व्यापारी महासंघाचे सुधीर डागा, भाऊसाहेब भाबड, विजय सांगळे, गोरे सर, सोमनाथ पाटील, अप्पा नवले, प्रज्वल ढाकणे, विनायक सोनवणे, डॉ. हिरालाल महानुभव, मधुकर टेके, सचिन परदेशी, प्रसाद पर्हे, विशाल राऊत, सचिन आढाव, संदीप देवरे, बाळासाहेब वायखिंडे, अप्पा नवले, सोमनाथ पाटील, प्रज्वल ढाकणे, विनायक सोनवणे, समाधान कंदे, राहुल कवरे, प्रशांत वाबळे मारुती मोरे, संतोष वाघ, शहरातील पर्यावरण प्रेमी नागरिक तसेच सोमैय्या महाविद्यालयाचे एन एन एस विद्यार्थी, बी. एस. गायकवाड सर, संजय दवंगे सर, अरगडे सर, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, नामदेवराव परजणे पाटील लॉ कॉलेजचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, एस एस जी एम कॉलेजचे एन एन एसचे विद्यार्थी, तराळ सर, दिघे सर, वाघमोडे सर तसेच गोदामाई ट्रस्टचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी सिनेअभिनेते चिन्मय उदगीरकर, व्यापारी महासंघाचे सुधीर डागा, मुख्याधिकारी सुहास जगताप, पोलीस उपनिरीक्षक संदीप सोने आदींनी आपले मनोगत व्यक्त करत ३६० आठवड्यापासून गोदावरी नदीची स्वच्छता करत असलेल्या गोदामाई ट्रस्टचे आदिनाथ ढाकणे व त्यांच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन करत त्यांना शुभेच्छा दिल्या.

तर याप्रसंगी व्यापारी महासंघाचे सुधीर डागा यांनी नदीपात्रात कोणी कचरा टाकू नये याकरीता सुरक्षेचा उपाय म्हणून आवश्यक ते सीसीटीव्ही कॅमेरे नदी पुलावर बसवण्यासाठी वैयक्तिकरित्या नगरपालिका प्रशासनाला देणार असल्याचे सांगितले.

## राज्यातील पहिले खाजगी पशुवैद्यकीय महाविद्यालय श्रीगोंद्यातील परिक्रमा शैक्षणिक संकुलात सुरू

**श्रीगोंदा । वीरभूमी–**

माजी मंत्री बबनराव पाचपुते विचारधारा ट्रस्ट संचलित परिक्रमा शैक्षणिक संस्थेला शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून राज्यातील पहिले खाजगी पशुवैद्यकीय (BVSc &AH) महाविद्यालय सुरू करण्यास केंद्र सरकारची मान्यता प्राप्त झाली आहे, अशी माहिती संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. प्रतापसिंह पाचपुते यांनी दिली.

parikrama
Revolution in Education

सदर महाविद्यालय महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (MAFSU), नागपूर यांच्याशी संलग्न असणार आहे. महाविद्यालय स्थापनेसाठी आवश्यक असलेले विद्यापीठाचे संलग्नता पत्र, राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) तसेच केंद्र सरकारकडून मिळणारे परवानगीपत्र (LOP) प्राप्त झाले असून भारतीय पशुवैद्यकीय परिषद (VCI) यांची मान्यताही मिळाली आहे. महाविद्यालयात पहिल्या टप्प्यात ८० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे.

महाविद्यालय सुरू करण्यापूर्वी परिक्रमा संस्थेच्या अधिकाऱ्यांनी देश-विदेशातील विविध खाजगी व शासकीय महाविद्यालयांना भेटी देऊन आवश्यक माहिती व अनुभव संकलित केला आहे. महाविद्यालयात अनुभवी प्राध्यापक व कर्मचारीवर्ग, प्रशस्त व स्वतंत्र इमारत, सुसज्ज ग्रंथालय, अत्याधुनिक प्रयोगशाळा, आधुनिक पशुचिकित्सा दवाखाना, मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे, क्रीडांगण तसेच बस सुविधा अशा सर्व आधुनिक सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

परिक्रमा शैक्षणिक संकुलात यापूर्वीच सीबीएसई शाळा, तंत्रनिकेतन, फार्मसी, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, बीबीए, बीसीए, एमसीए, विधी महाविद्यालय तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये कार्यरत आहेत. नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे.

अधिक माहितीसाठी इच्छुकांनी परिक्रमा शैक्षणिक संकुलास प्रत्यक्ष भेट द्यावी, असे आवाहन पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. के. एस. रिसम यांनी केले आहे.

# अकोलेत आजपासून रंगणार शिक्षक क्रिकेट स्पर्धेचा महासंग्राम

## अकोले एज्युकेशन प्रीमिअर लीग २८-२९ मार्चचे आयोजन

**अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुका पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अरविंदकुमावतयांच्यासंकल्पनेतून अकोले तालुक्यातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी अकोले एज्युकेशन प्रीमिअर लीग चे आयोजन शनिवार, २८ मार्च ते रविवार, २९ मार्च २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे.



अकोले तालुका शिक्षक क्रिकेट स्पर्धेचे हे दुसरे वर्ष असून यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक, माध्यमिक-उच्च माध्यमिक शिक्षक तसेच आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी होणार आहेत.

स्पर्धेतील पारितोषिके पुढील प्रमाणे आहेत: प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या संघास १५,०००/- आणि सन्मानचिन्ह.

द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या संघास ७,०००/- आणि सन्मानचिन्ह.

तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या संघास ५,०००/- आणि सन्मानचिन्ह.

उत्कृष्ट खेळ करणाऱ्या खेळाडूंना वैयक्तिक बक्षिसे.

गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत यांनी या स्पर्धा मागील वर्षांपासून अकोले तालुक्यात सुरू केल्या आहेत. यामागचा हेतू शिक्षकांना दररोजच्या कामातून विरंगुळा मिळावा, शिक्षकांमध्ये एकजूट व सहकार्याची भावना वाढीस लागावी, शारीरिक आरोग्य सुदृढ रहावे व शिक्षकांचा आत्मविश्वास वृद्धिंगत व्हावा असा आहे.

अकोले तालुक्यातील शिक्षकांसाठी ही पहिली संकल्पना असल्यामुळे अरविंद कुमवत यांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे. या स्पर्धेचा अनुभव घेण्यासाठी सर्व क्रिकेट प्रेमींनी २८ आणि २९ मार्च रोजी आय.टी.आय. मैदान, अकोले येथे उपस्थित राहावे, असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

# पारनेरमध्ये सम्राट अशोक जयंतीनिमित्त सामाजिक प्रश्नांवर सखोल मंथन

## मौलिक अधिकार, जनगणना व सामाजिक प्रभाव अहवालावर मार्गदर्शन; विविध मान्यवरांची उपस्थिती

**पारनेर । वीरभूमी–**

;उपशिर्षक :

'युनिटी ऑफ मुलनिवासी समाज' आणि 'पारनेर तालुका बौद्ध हितवर्धक सेवा संघ' यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर येथे चक्रवर्ती सम्राट अशोक महान यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने केवळ अभिवादनच नव्हे, तर समाजासमोरील सध्याची आव्हाने आणि घटनात्मक अधिकारांवर सखोल चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युनिटी ऑफ मुलनिवासी समाजचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राजेंद्र करंदीकर होते. प्रमुख उपस्थितीत सुरेश रोकडे, महेंद्र बोरुडे, विलास साठे, विरेंद्र पवार, बाळासाहेब पातारे, प्रदीप नगरे, संपत नगरे, हिरामण सोनवणे, देवेंद्र जाधव, सुनील चौधरी, दादाभाऊ पटेकर, जनार्दन सोनवणे, चंद्रकांत शिंदे, गौतम सूर्यवंशी, माही सूर्यवंशी, मोहन कसबे, संतोष वाबळे, संतोष अडसूळ, रमेश गायकवाड, प्रकाश करंदीकर, श्रावण गायकवाड, मनोज सूर्यवंशी, सुभाष गायकवाड, भाऊसाहेब उमाप आदी मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात राजेंद्र करंदीकर यांनी 'मौलिक अधिकार संरक्षण परिषदे'च्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचे आणि आपले हक्क जोपासण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. मात्र, सध्याच्या काळात या मौलिक अधिकारांवर गदा येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी समाजाने जागृत राहणे आणि संघटित होणे ही काळाची गरज आहे.

यावेळी प्रामुख्याने तीन ज्वलंत विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. संविधानातील कलम १२ ते ३५ अंतर्गत मिळणाऱ्या हक्कांची माहिती देऊन अन्यायाविरुद्ध आवाज कसा उठवावा, यावर मार्गदर्शन करण्यात आले. समाजाच्या विकासासाठी आणि न्याय्य वाटपासाठी अचूक जनगणनेचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. तसेच 'सामाजिक प्रभाव अहवाल' (SIR) संदर्भात चर्चा करताना, धोरणात्मक निर्णयांचा मुलनिवासी समाजावर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात सम्राट अशोक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी पारनेर तालुका बौद्ध हितवर्धक सेवा संघाचे पदाधिकारी, युनिटी ऑफ मुलनिवासी समाजचे कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

चक्रवर्ती सम्राट अशोकांनी दिलेला शांतता आणि धम्माचा संदेश आजही जगाला दिशा देणारा आहे, अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुरोगामी चळवळीचे कार्यकर्ते व विविध संघटनांच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ठोस धोरण निश्चित करा

## आ. आशुतोष काळेंची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**कोपरगाव । वीरभूमी–**

राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या मोठ्या आर्थिक संकटात सापडला असल्याने कांदा प्रश्नांवर मार्ग काढण्यासाठी बुधवार (दि. २५) रोजी मंत्रालय, मुंबई येथे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली व उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक संपन्न झाली. या बैठकीत आ. आशुतोष यांनी मुख्यमंत्र्यांकडे कांदा प्रश्नावर ठोस धोरण निश्चित करण्याची मागणी केली.



राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या नैसर्गिक आपत्ती आणि बाजारपेठेतील अनिश्चित दर अशा दुहेरी संकटात सापडले आहेते. कांद्याच्या दरात झालेली घसरण कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी चिंतेची बाब बनली असून सद्यस्थितीत कांद्याला मिळणारा भाव पाहता शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघणे अशक्य झाले आहे. शेतकऱ्यांच्या पदरात किमान दोन पैसे पडावेत आणि शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी सरकारने कांदा प्रश्नावर योग्य निर्णय घेणे गरजेचे असल्याने कांदा उत्पादक पट्ट्यातील विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करून बाजारभावातील चढ-उतार आणि निर्यात धोरण यांमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजनांबाबत शासनाने ठोस धोरण निश्चित करण्याची मागणी आ. आशुतोष काळे यांनी मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे या बैठकीत केली आहे.

या महत्त्वपूर्ण बैठकीसाठी अन्न व नागरी पुरवठामंत्री ना.छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदामंत्री ना. गिरीशजी महाजन, कृषीमंत्री ना. दत्तात्रय भरणे, शालेय शिक्षण मंत्री ना. दादा भुसे, अन्न व औषध प्रशासनमंत्री ना. नरहरी झिरवळ, पणन व राजशिष्टाचार मंत्री ना. जयकुमार रावल तसेच इतरही मतदारसंघांचे विधानसभा सदस्य आणि प्रशासकीय वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## ३१ मार्चपूर्वी कर्जफेड करा; कर्जमाफी योजनेचा लाभ घ्या : राजेंद्र नागवडे

**श्रीगोंदा । वीरभूमी–**

शेतकरी सभासदांनी आपल्या दीर्घ मुदत, मध्यम मुदत तसेच पशुपालन कर्जाची परतफेड ३१ मार्चपूर्वी करून शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे यांनी केले आहे.



प्रसिद्धी पत्रकाद्वारे त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाने कर्जदार शेतकऱ्यांसाठी ही कर्जमाफी योजना जाहीर केली असून, थकीत कर्जदारांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचा लाभ मिळणार आहे. मात्र, या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी ३१ मार्चपूर्वी आपले सर्व प्रकारचे कर्ज, विशेषतः दीर्घ मुदत, मध्यम मुदत व पशुपालन कर्जाची परतफेड करणे आवश्यक आहे. अन्यथा कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यासोबतच, कर्ज थकीत राहिल्यास सध्याच्या १३ टक्के व्याजदराऐवजी १५ टक्के व्याज लागू होणार असून त्यामुळे शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडू शकतो. वेळेत कर्जफेड केल्यास जिल्हा सहकारी बँकेकडून पुढील कर्ज मिळणे सुलभ होईल, असेही त्यांनी नमूद केले. तरी सर्व कर्जदार शेतकरी सभासदांनी वेळेत कर्जफेड करून शासनाच्या कर्जमाफी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन राजेंद्र दादा नागवडे यांनी केले आहे.

# पाथर्डीत लाखो भाविकांच्या उपस्थितीत राम नवमी उत्सवाची पालखी मिरवणूक

## ढोल-ताशांचा गजर, जिवंत देखावे, चित्ररथांची रेलचेल । भक्तीमय वातावरणात पाथर्डी शहर दुमदुमले

**● पाथर्डी । वीरभूमी –**

अतिशय सुरेख, सुंदर, भव्य-दिव्य, अविस्मरणीय आणि नयनरम्य असे वर्णन करावे असा पाथर्डी शहराचा सुसंस्कृत व सांस्कृतिक ठेवा ठरलेला राम नवमी उत्सव सोहळा लाखो रामभक्तांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. आसमंत दुमदुमणारा ढोल-ताशांचा निनाद, हिंदू रक्षा युवा मंचच्या तरुणांचा ओसंडून वाहणारा उत्साह, जय श्रीराम घोषणांचा गगनभेदी आवाज आणि लाखो रामभक्तांचा सळसळता उत्साह यामुळे संपूर्ण शहर भगव्या वातावरणात न्हाऊन निघाले होते. कमानी व पताकांनी सजलेल्या शहरातून दिमाखदारपणे निघालेली प्रभू श्रीरामांची पालखी मिरवणूक पाथर्डीकरांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारी ठरली.

या श्रीराम जन्मोत्सव सोहळ्यात विविध राज्यांतून आलेल्या कलापथकांचा सहभाग, जिवंत देखावे, चित्ररथांची आकर्षक मांडणी आणि गगनभेदी घोषणाबाजी यामुळे संपूर्ण गाव उत्सवमय झाले होते. सायंकाळी हजारोंच्या उपस्थितीत भक्तीमय वातावरणात मिरवणुकीला प्रारंभ झाला. शेवगाव रोड ते अजंठा चौक दरम्यान रस्त्याच्या दुतर्फा भाविकांची प्रचंड गर्दी पाहायला मिळाली. शहरवासीयांनी संपूर्ण मार्ग सडा-रांगोळ्यांनी सजवला होता, तर





अनेक ठिकाणी पुष्पवृष्टी करण्यात आली.

पश्चिम बंगाल येथील श्रीविष्णू दशावतार, केरळ येथील प्राचीन युद्धकला कलरीपटू, अफजलखान वध, स्वामी समर्थ अवतार यांचे जिवंत देखावे तसेच ढोल पथक व महिला टाळपथक हे मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण ठरले. हिंदू रक्षा युवा मंच व विविध संघटनांच्या वतीने आयोजित या सोहळ्यात शंकर मठाचे मठाधिपती माधव बाबा, राम महाराज झिंजुर्के, मोहन महाराज सुडके आदी संतांच्या उपस्थितीत पालखी पूजन करण्यात आले.

यावेळी आमदार मोनिका राजळे, ॲड. प्रतापराव ढाकणे, नगराध्यक्ष अभय आव्हाड, मंगलताई भालेराव व जयंती भालेराव, मोहटा देवस्थानचे विश्वस्त बाळासाहेब लाहोटी, नगरसेवक नंदकुमार शेळके, बंडू बोरुडे, अमोल गर्जे, प्रतीक खेडकर, प्रतीक नांगरे, देवा पवार, दिपाली बंग, मंगलताई कोकाटे, डॉ. मृत्युंजय गर्जे, बंडू पाटील बोरुडे, डॉ. जगदीश मुने, अरविंद पारगावकर, शिवशंकर राजळे, बजरंग घोडके, महेश बोरुडे, अजय भंडारी आदी मान्यवर उपस्थित होते. यानंतर मिरवणुकीला सुरुवात झाली.

मिरवणुकीदरम्यान गोविंद महाराज जाटदेवळेकर तसेच तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री यांनी भेट देत पालखीचे दर्शन घेतले. स्थानिक युवकांचे राम राज्य ढोल पथक हे सर्वात भव्य व शिस्तबद्ध पथक म्हणून सर्वांचे विशेष कौतुक मिळवणारे ठरले.

दिव्य ज्योती जागृती संस्थान, प्रजापिता ब्रह्मकुमारी, तिरुपती बालाजी व खाटू श्याम यांच्या आकर्षक चित्ररथांनी भाविकांचे लक्ष वेधले. पश्चिम बंगालच्या रेम्बो डान्स ग्रुपकडून सादर करण्यात आलेला श्रीविष्णू दशावतार देखावा विशेष आकर्षण ठरला. जय बजरंग मित्र मंडळ नाथनगरच्या शिवाजी महाराज देखाव्याने प्रेक्षकांची मोठी गर्दी खेचली. सुवर्णयुग परिवार ट्रस्टचा खाटू श्याम व सोनटक्के परिवाराचा बालाजी मंदिराचा देखावा भाविकांनी मनोभावे अनुभवला.

मिरवणूक मार्गावर विविध मंडळे, व्यापारी संघटना व गणेश मंडळांकडून नाश्ता, सरबत व पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले. अजंठा चौकातील फायर शो आणि आतषबाजीने वातावरण उजळून निघाले. भजन व धार्मिक गाण्यांमुळे भक्तीभाव अधिकच वृद्धिंगत झाला.

सुमारे दोन किलोमीटरच्या मिरवणूक मार्गावर भगव्या कमानी व झालरींमुळे आकर्षक सजावट करण्यात आली होती. सर्व धर्मीय स्त्री-पुरुषांनी रात्री उशिरापर्यंत मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याचा आनंद घेतला. महिलांनी औक्षण व आरती करून पालखीतील रामलल्लाचे दर्शन घेतले.

यंदा प्रथमच आमदार राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाची आढावा बैठक घेण्यात आली होती. त्यामुळे सर्व विभागांनी उत्तम सहकार्य केले. आरोग्य पथक, म्बलन्स व मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व विविध संघटनांच्या कार्यकर्त्यांनी वाहतूक व्यवस्थापनात मदत केली.

पोनि. विलास पुजारी, पोउनि. विलास जाधव, निवृत्ती आगरकर, संदीप ढाकणे, नितीन दराडे, नागेश वाघ, महेश रुईकर, अक्षय वडते यांच्या मार्गदर्शनाखाली पाथर्डी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला. वाहतूक पोलीस मधुकर कोकाटे, शिवाजी नागरे व अल्ताफ शेख यांनी वाहतुकीचे योग्य नियोजन केल्याने मिरवणूक निर्विघ्नपणे पार पडली.

# अमरापूर येथील श्री रेणुकामाता मंदिर परिसरात शमी गणपती मंदिराचा कलशारोहण उत्साहात

## वासंतिक नवरात्रोत्सवानिमित्त भव्य सोहळा । महंत रमेश अप्पा महाराजांच्या हस्ते विधी

**● शेवगाव । वीरभूमी –**

तालुक्यातील श्रीक्षेत्र अमरापूर येथील रेणुकामाता देवस्थानात सुरू असलेल्या वासंतिक नवरात्रोत्सवाच्या औचित्याने येथील अष्टकोनी, सोळा खांबी यज्ञ मंडपाजवळ नव्याने उभारण्यात आलेल्या भव्य शमी गणपती मंदिरावर हनुमान टाकळी देवस्थानचे महंत रमेश अप्पा महाराज यांच्या हस्ते विधीवत कलशारोहण करण्यात आले.

प्रारंभी सकाळी साडेसात वाजता कळसाची देवस्थान परिसरात मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर विधीस प्रारंभ झाला. हा विधी सायंकाळी साडेचार वाजेपर्यंत चालला.

यावेळी महंत रमेश अप्पा महाराज म्हणाले की, माऊलींनी प्रतिपादित केल्यानुसार भगवान



गणेश हे ईश्वराचे आद्यरूप आहेत. या वासंतिक नवरात्रोत्सवाच्या कालावधीत श्री गणेशाच्या नव्या मंदिराची व कळसाची स्थापना हा दुग्धशर्करा योग आहे. श्री गणेश हे विघ्नविनाशक असल्याने उपासना व अनुष्ठानात येणारी विघ्ने आपोआप दूर होतात. श्री गणेश ही वेदप्रतिपादित देवता असल्याने त्यांच्या उपासनेचे अनन्यसाधारण महत्त्व संत-महंतांनी अधोरेखित केले आहे.

येथील गणेशाचे वैशिष्ट्य असे की, गणेशास प्रिय असणारा शमी वृक्ष येथे स्वयंप्रकट झाला आहे. त्यामुळे या शमी गणेशावर भाविकांची मोठी श्रद्धा असल्याचा इतिहास आहे. हा शमी गणेश सर्व भाविकांचे विघ्न दूर करून त्यांच्या मनोकामना पूर्ण करो, असा आशीर्वादही रमेश अप्पा महाराजांनी दिला.

कलशारोहण विधीचे पौरोहित्य वे. शा. सं. सच्चिदानंद देवा देशपांडे, तुषार देवा तसेच देवस्थानच्या अन्य ब्रह्मवृंदांनी केले.

यावेळी रेणुका भक्तानुरागी, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रशांतनाना भालेराव, मंगलताई भालेराव, जयंती भालेराव, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, चंद्रकांत गळगट्टी, डॉ. अरविंद पोटफोडे, श्रीमंत घुले यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागरिकांना रस्ते, पाणी आणि मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आ. आशुतोष काळेंची विकासाशी बांधिलकी

## संदीप कपिले । कोपरगावातील प्रभाग क्र.१ मधील अंतर्गत रस्त्याच्या डांबरीकरणास प्रारंभ

**● कोपरगाव । वीरभूमी –**

शहराच्या नागरिकांना रस्ते, पाणी आणि मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आ. आशुतोष काळे यांनी महायुती शासनाकडे पाठपुरावा करून भरघोस निधी दिला असून शहरातील प्रभाग क्र. १ मधील कर्मवीरनगर भागातील अंतर्गत रस्त्यांसाठी १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. आ. आशुतोष काळे यांच्या विकासदृष्टीतून कोपरगाव शहराचे मुलभूत प्रश्न सुटले असून सर्वांगीण झाला आहे. त्यामुळे आ.आशुतोष काळेंची फक्त विकासाशी बांधिलकी आहे असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी संदीप कपिले यांनी केले.

कोपरगाव शहरातील



प्रभाग क्र.१ मधील अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या अंतर्गत रस्त्याच्या डांबरीकरण कामास श्रीरामनवमीच्या मुहूर्तावर गुरुवारी (दि.२६) रोजी प्रारंभ करण्यात आला यावेळी संदीप कपिले बोलत होते. चार महिन्यांपूर्वी या रस्त्याच्या खडीकरणाचे काम पूर्ण करण्यात येवून गुरुवार रोजी डांबरीकरणाच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. राजकारणाच्या वेळी राजकारण आणि इतर वेळी केवळ विकास हे आ. आशुतोष काळे यांचे धोरण असून त्यामुळे कोपरगाव शहराचा खऱ्या अर्थाने विकास झाला आहे. आ.आशुतोष काळे यांच्या हाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते शहराच्या हितासाठी कार्यरत असल्याचे संदीप कपिले यांनी यावेळी सांगितले.

यावेळी सचिन गवारे, रामचंद्र थोरात, परसराम वाकचौरे, रावसाहेब थोरात, मयूर राऊत, भावेश थोरात, जुनेद शेख, शाहरुख शेख यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि प्रभाग क्र. १ मधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामदास पुजारी यांचा व्हिएतनाममध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय साहित्य पुरस्काराने सन्मान

**● पारनेर । वीरभूमी –**

कवी व लेखक तसेच निवृत्त सहायक वनसंरक्षक रामदास पुजारी यांना नुकतेच हनोई, व्हिएतनाम येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा गौरव जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाद्वारे व्हिएतनाममध्ये आयोजित सहाव्या आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलनात त्यांच्या साहित्य, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदानासाठी देण्यात आला.

पुजारांच्या प्रकाशित साहित्यसंपदेत 'आई माझं जग', 'उद्याच्या श्वासासाठी', 'खोल मनाच्या तळाशी' या काव्यसंग्रहांसह 'पर्यावरणविषयक घोषवाक्ये' ही



पुस्तिका आहेत. वने, वन्यजीव व पर्यावरण विषयक जनजागृतीसाठी त्यांनी विविध वृत्तपत्रे, मासिके, प्रसारमाध्यमे, आकाशवाणी व दूरदर्शन यांतून लेख, कविता, घोषवाक्ये, व्याख्याने आणि भाषणे मांडून महत्त्वाचे योगदान दिले आहे.

दिनांक २१ मार्च जागतिक वनदिनी झालेल्या या विश्व साहित्य संमेलनात पुजारांनी 'आंबेडकरवादी विश्व साहित्य व वंचितांचे प्रश्न' या परिसंवादामध्ये सहभाग घेतले. त्यांनी 'Nature for All' आणि 'All for Nature' या तत्त्वांनुसार निसर्गाचे रक्षण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले आणि 'माझी वसुंधरा माझी आई' ही कविता सादर केली. या पुरस्कारासाठी पुजारी यांचे सहकारी, मित्र आणि समाजाच्या विविध स्तरांमधून अभिनंदन होत आहे.

# बालक व महिलांच्या संरक्षणासाठी स्नेहालयचा उपक्रम

## २८ मार्च रोजी जनजागृती, आरोग्य शिबिर व शैक्षणिक मार्गदर्शनाचा संगम

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत बालकांचे संरक्षण, महिलांची सुरक्षितता आणि सर्वांसाठी शिक्षणाचा अधिकार अधिक महत्त्वाचा ठरत आहे. अजूनही अनेक मुलं शिक्षणापासून वंचित राहतात, बालविवाह, बालहक्कांचे उल्लंघन आणि महिलांवरील अन्याय यांसारख्या समस्या समाजात दिसून येतात. अशा परिस्थितीत प्रत्येक बालकाला सुरक्षित बालपण, शिक्षणाची संधी आणि महिलांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळणे ही काळाची गरज बनली आहे.

समाजाचा खरा विकास हा बालक आणि महिलांच्या संरक्षणातूनच शक्य आहे, या उद्देशाने स्नेहालय संस्थेच्या विविध प्रकल्पांच्या संयुक्त विद्यमाने विशेष जनजागृती व सेवा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

बालक आणि महिला यांचे संरक्षण, शिक्षण, आरोग्य आणि योजनांच्या संधींचा संगम या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम शनिवार, दि. २८ मार्च २०२६ रोजी मनपा प्राथमिक शाळा, गांधीनगर (लिंगेश्वर मंदिरासमोर, बोल्हेगाव) येथे सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत पार पडणार आहे. शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी नवीन प्रवेश सर्वेक्षण आणि शाळेत प्रवेशाबाबत जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे.

यासोबतच नागरिकांच्या आरोग्याची काळजी लक्षात घेऊन मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून लहान मुले, महिला आणि पुरुषांसाठी तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी व मार्गदर्शन दिले जाणार आहे. शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक संरक्षण या तिन्ही गोष्टी एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

या कार्यक्रमामध्ये स्नेहालयच्या विविध प्रकल्पांची सविस्तर माहिती नागरिकांना देण्यात येणार आहे. युवकांसाठी कौशल्य विकास केंद्राद्वारे प्रशिक्षण व करिअर मार्गदर्शन, स्नेहाधार प्रकल्पांतर्गत महिला सक्षमीकरण व कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध, केअरिंग फ्रेंड्स हॉस्पिटलमार्फत परवडणाऱ्या दरात उपचार, कम्युनिटी हेल्थ सेंटरद्वारे आरोग्य सेवा तसेच उडान, मुक्ती वाहिनी आणि स्नेह बाला आधार प्रकल्पांद्वारे बाल संरक्षण, बालहक्क, बालविवाह मुक्त जिल्हा अभियान आणि महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात येणार आहे.

या उपक्रमामुळे नागरिकांना शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन एकाच ठिकाणी मिळणार असून शाळेत प्रवेशासाठी थेट मदतही उपलब्ध होणार आहे, अशी माहिती स्नेहालय संस्थेचे संचालक हनिफ शेख यांनी दिली.

# पारनेरमध्ये बालविवाह प्रतिबंधासाठी 'उडान'ची झेप

## सम्राट अशोक जयंतीनिमित्त जनजागृती अभियान । शिक्षण, आरोग्य व पुनर्वसनावर मार्गदर्शन

**● पारनेर । वीरभूमी–**

चक्रवर्ती सम्राट अशोक महान यांच्या जयंतीचे औचित्य साधून पारनेर शहरात बालविवाह प्रतिबंधक जनजागृती आणि सामाजिक उत्थानासाठी विशेष अभियान राबविण्यात आले. स्नेहालय संस्थेच्या 'उडान' प्रकल्पांतर्गत आयोजित या अभियानाद्वारे बालविवाह रोखणे, शिक्षण, आरोग्य आणि पुनर्वसन या विषयांवर स्थानिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

आजच्या आधुनिक युगातही बालविवाहाची प्रथा समाजाला पोखरत आहे. ही प्रथा मुळापासून उखडून टाकण्यासाठी स्नेहालय संचलित 'उडान' प्रकल्पाने पुढाकार घेतला आहे. या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट केवळ बालविवाह रोखणे इतकेच मर्यादित नसून, पीडित मुलींचे शिक्षण, आरोग्य आणि त्यांना स्वावलंबी बनवणे हे देखील आहे.

या प्रसंगी 'उडान' प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रवीण कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक कार्यकर्ते भगवान गायकवाड यांनी उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. गायकवाड यांनी आपल्या



भाषणात बालविवाहाचे शारीरिक व मानसिक दुष्परिणाम स्पष्ट करत सांगितले की, बालविवाह हा केवळ कायदा मोडणारा गुन्हा नसून, तो एका बालकाचे भविष्य अंधकारात ढकलणारा प्रकार आहे. प्रत्येक मुला-मुलीला शिक्षणाचा आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे.

यावेळी शिक्षणाचे महत्त्व सांगतानाच, आरोग्य आणि पुनर्वसन प्रक्रियेत 'उडान' प्रकल्प कशा प्रकारे मदतीचा हात देतो, याची माहितीही देण्यात आली.

या सामाजिक अभियानाला समाजातील विविध स्तरांतून पाठिंबा मिळाला. या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र करंदीकर, श्रावण गायकवाड, सुरेश रोकडे, बाळासाहेब पातारे, देवेंद्र जाधव, रमेश गायकवाड, संतोष वाबळे, संतोष अडसूळ, मोहन कसबे, वसंत पाडळे, दादाभाऊ पटेकर, गौतम सूर्यवंशी, प्रकाश करंदीकर, सुनील चौधरी, जनार्दन सोनवणे, सुभाष गायकवाड, प्रदीप नगरे, चंद्रकांत शिंदे, महेंद्र बोरुडे, प्रदीप कसबे, राजू उघडे यांसह अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित सर्वांनी बालविवाह रोखण्यासाठी आणि सामाजिक परिवर्तनासाठी कटीबद्ध राहण्याची शपथ घेतली. सम्राट अशोक यांच्या 'धम्म' विचारांनुसार सामाजिक न्याय आणि समता प्रस्थापित करण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. 'स्नेहालय'च्या या उपक्रमामुळे पारनेर तालुक्यातील ग्रामीण भागात बालविवाहाबाबत व्यापक जनजागृती होण्यास मदत होणार आहे.

# निमगाव वाघा येथे श्रीराम नवमी उत्साहात



**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

निमगाव वाघा (ता. नगर) येथे श्रीराम नवमीचा पवित्र उत्सव अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. गावात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याच्या निमित्ताने श्रीराम जन्मोत्सव मोठ्या श्रद्धेने पार पडला. गेली सलग ३९ वर्षे ही परंपरा कायम राखत दरवर्षी सप्ताहादरम्यान रामजन्मोत्सव साजरा झाला.

श्री नवनाथ महाराज मंदिरात हा धार्मिक सोहळा पार पडला. मंदिर परिसरात रामनामाच्या गजराने वातावरण भारावून गेले होते. महिलांनी पारंपरिक पद्धतीने पाळणा हलवून प्रभू श्रीरामांच्या जन्माचे स्वागत केले. त्याचबरोबर भक्तीगीत, अभंग व भजनांच्या सादरीकरणाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. या सोहळ्यात आशाबाई ठाणगे, वीना बोडखे, कमल शिंदे, सुनीता डोंगरे, अनिता खांदवे, मंदा खळदकर, लता फलके, सुमन ठाणगे आदी महिलांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

यावेळी माजी सरपंच साहेबराव बोडखे, सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे, भागचंद जाधव, प्रशांत जाधव, एकनाथ डोंगरे, नामदेव फलके, एकनाथ धायतडक, गोरख फलके गुरुजी, सखाराम फलके, ज्ञानदेव जाधव, अतुल फलके, मारुती फलके आदी मान्यवर उपस्थित होते.